# प्रेसनोट

महावितरण शाखा कार्यालय वाडा. ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील श्री. अमित आप्पासाहेब पाटील, सहा. अभियंता, वर्ग–२ यांना लाच घेताना रंगेहाथ पकडल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ताब्यात घेतले बाबत.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सिंधुदुर्ग |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री. अमित आप्पासाहेब पाटील, सहा. अभियंता, वर्ग–२ महावितरण शाखा कार्यालय वाडा, ता. देवगड |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबध अधिनियम सन १९८८ (संशोधन २०१८) चे कलम ७ प्रमाणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ३०,०००/– रूपये |
| स्विकारलेली लाच रक्कम | ३०,०००/– रूपये |

**थोडक्यात हकीगत:–**

यातील तक्रारदार यांनी सुमारे सव्वा वर्षापुर्वी विद्युत उपकेंद्र, वाडा येथे त्यांच्या वडीलांच्या तसेच मित्राच्या बागेत विद्युत कनेक्शन मिळणेकरीता विद्युत उपकेंद्र वाडा, ता. देवगड येथे विनंती अर्ज दिलेला होता. सदर अर्जाबाबत वेळोवेळी विचारणा केली असता सदरचे अर्ज मंजुरीसाठी वरिष्ठ कार्यालयात पाठविण्यात आल्याचे सांगितले जात होते. दिनांक १७/०२/२०२३ रोजी तक्रारदार यांनी विद्युत उपकेंद्र वाडा येथे जावुन विद्युत उपकेंद्र प्रमुख श्री. पाटील यांची भेट घेतली. त्यावेळी लोकसेवक श्री. पाटील यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांच्या वडीलांच्या व मित्राच्या बागेत विद्युत कनेक्शन देणेसाठी एकुण ३०,०००/- रुपयांची लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लोकसेवक श्री. पाटील यांची अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, सिंधुदुर्ग कार्यालयीन वेब मेलवर दिनांक २१/०२/२०२३ लाचेच्या मागणीची तक्रार दिली होती.

तक्रारदार यांचे वेब मेलवरील तक्रारीचे अनुषंगाने त्यांची वाडा, ता. देवगड येथे समक्ष भेट घेतली त्यावेळी त्यांनी लोकसेवक श्री. पाटील यांचेविरूध्द लाचेच्या मागणीची सविस्तर तक्रार स्वहस्ताक्षरात लिहुन दिली. तक्रारदार यांचे तक्रारीचे अनुषंगाने दिनांक २८/०२/२०२३ रोजी सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करून लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता लोकसेवक श्री. पाटील, विद्युत उपकेंद्र प्रमुख, वाडा यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे वडीलांच्या बागेतील मांगरात विद्युत कनेक्शन देणेसाठी २०,०००/- रू. तसेच त्यांचे मित्राच्या वाडा, सडेवाडी, ता. देवगड येथील बागेत विद्युत कनेक्शन देणेसाठी १०,०००/- अशी एकुण ३०,०००/- रू. लाचेची मागणी केल्याने लोकसेवक श्री. पाटील यांचेविरूध्द आज दिनांक ०६/०४/२०२३ रोजी विद्युत उपकेंद्र, वाडा, ता. देवगड येथे लाचेचा सापळा आजमाविला असता, त्यांना तक्रारदार यांचेकडुन ३०,०००/- रू. लाच स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आलेले आहे.

वरील कारवाई श्री. दिपक कांबळे, पोलीस उपअधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, सिंधुदूर्ग यांचेकडून करण्यात आलेली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सिंधुदुर्ग कार्यालयाशी संपर्क साधावा.

---

**मार्गदर्शन अधिकारी– मा. श्री. सुनिल लोखंडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. ठाणे परिक्षेत्र ठाणे.**
**मा. श्री. अनिल घेरडीकर, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. ठाणे परिक्षेत्र ठाणे.**

संपर्क पत्ता :– ला.प्र.वि. सिंधुदुर्ग, तहसीलदार कार्यालयासमोर समोर, कुडाळ, जि.सिंधुदुर्ग, (४१६५२०)
संकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई–मेल :– dyspacbsindhudurga@gmail.com
ऑनलाईन तक्रार :– acbmaharashtra.net
व्हाटसअ‍ॅप नंबर :– ९९३०९९७७००
टोल फ्री क्र. :– १०६४
दुरध्वनी क्र. :– ०२३६२–२२२२८९